# श्री गजानन महाराज अष्टक (दासगणूकृत)

गजानना गुणागरा परम मंगला पावना ।
अशीच अवघें हरी, दुरीत तेंवि दुर्वासना ॥
नसे त्रिभुवनामधे तुजविणे आम्हां आसरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥१॥

निरालसपणें नसे घडलि अल्प सेवा करीं ।
तुझी पतितपावना भटकलों वृथा भूवरी ।
विसंबत न गाय ती आपुलिया कधीं वासरा ।
करी पदनातावरी बहु दया न रोषा धरा ॥२॥

अलास जगी लावण्या परतुनी सु-वाटे जन ।
समर्थ गुरुराज ज्या भुषवि नाम नारायण ॥
म्हणून तुज प्रार्थना सतत जोडुनिया करा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥३॥

क्षणांत जल आणिलें नसून थेंब त्या वापिला ।
क्षणांत गमनाप्रती करिसि इच्छिलेल्या स्थला ।
क्षणांत स्वरूपे किती विविध धरिसी धीवरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥४॥

अगाध करणी तुझी गुरुवरा ! न लोकां कळे ।
तुला त्यजुनी व्यर्थ ते अचरितात नाना खुळे ।
कृपा उदक मागती त्यजुनी गौतमीच्या तिरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥५॥

समर्थस्वरूपप्रती धरून साच बाळापुरी ।
तुम्ही प्रगट जाहलां सुशिल बाळकृष्णा घरीं ।
हरिस्वरूप घेऊनि दिधली भेट भीमातिरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥६॥

सछिद्र नौकेप्रती त्वदिय पाय हे लागतां ।
जलांत बुडता तरी तिजसी नर्मदा दे हाता ।
अशा तुजसि वाणण्या नच समर्थ माझी गिरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥७॥

अतां न बहु बोलतां तव पदांबुजा वंदितों ।
पडो विसर ना कदा मदिय हेंचि मी मागतों ।
तुम्ही वरद आपुला कर धरा गणूच्या शिरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥८॥




\- संत गजानन महाराज मंदीर, माले.